Newspaper- Maharashtra Times

Date: 26th February 2026

News article on English Literary Circle (ELC) organized event titled “Blind Date with a Book” on 18th February 2026.

# पुस्तकांशी जडलं अनोखं नातं

**गायत्री देव,** पोदार कॉलेज
(कॉलेज क्लब रिपोर्टर)




फेब्रुवारी महिना हा प्रेमाचा महिना म्हणून ओळखला जातो, त्यामुळे पुस्तकरूपी व्हॅलेंटाइनसोबत डेट करण्याचा मोह माटुंग्याच्या **पोदार कॉलेज**च्या इंग्रजी साहित्य मंडळातील विद्यार्थ्यांना झाला. याच निमित्तानं एक सुंदर कल्पना यशस्वीरित्या पार पाडली, ती म्हणजे 'ब्लाइंड डेट विथ अ बुक'. सोशल मीडियाच्या युगात पुस्तकांशी असलेलं नातं कमी होत चाललंय. पण हेच नातं अजून घट्ट करून आपण पुस्तकांसोबतही डेट करू शकतो हा या संकल्पनेमागचा हेतू होता. गेल्या तीन वर्षांपासून हा उपक्रम अधिकाधिक बहरत जात आहे. पुस्तकांशी डेट करण्याच्या या अनोख्या उपक्रमाला विद्यार्थ्यांसकट शिक्षकांचा ही भरघोस प्रतिसाद मिळाला.

'ब्लाइंड डेट विथ अ बुक' हा विषय घेऊनं मुलांनी वेगवेगळी पुस्तकं आणली होती. कव्हर लावलेलं कोणतंही एक पुस्तक आत काय आहे, हे माहीत नसताना विद्यार्थ्यांनी उचलायचं आणि नव्या भावविश्वात जायचं, असं त्या उपक्रमाचं स्वरूप होतं. त्याचबरोबर तीन गेम्सही घेण्यात आले. आपल्याला आवडणाऱ्या एखाद्या काल्पनिक पात्राशी आपण कवितांच्या माध्यमातून संवाद साधू शकतो, यासाठी एक जागा तयार केली होती. दुसरा गेम म्हणजे एकाच्या कानात पुस्तकाचं नाव सांगायचं आणि ओठांच्या हालचालींवरून दुसऱ्यानं पुस्तकाचं शीर्षक ओळखायचं. या खेळानं तर या कार्यक्रमाला वेगळीच रंगत आणली.

विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या जॉनरच्या चिठ्ठ्या देण्यात आल्या होत्या त्यातल्या उचललेल्या एका जॉनरवर वेगवेगळे प्रश्न त्यांना विचारले गेले. त्यानंतर वाचन छंदाशी निगडित किंवा पात्रांच्या हिशेबानं मुलांना त्यांना वाटणारा रेड फ्लॅग आणि ग्रीन फ्लॅग ठरवायचा होता. हे सगळे अनोखे उपक्रम व्यवस्थित पार पडण्यासाठी विद्यार्थ्यांची प्रचंड मेहनत दिसून आली. पुस्तकांना कव्हर घालण्यापासून ते त्यावर एक दोन ओळी आत काय आहे, हे कळण्यासाठी कव्हरवर लिहिण्यापर्यंत सगळी मेहनत इंग्रजी साहित्य मंडळाच्या विद्यार्थांनी घेतली. अर्थात, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विनिता पिंपळे यांच्या नेतृत्वाखाली आणि विभाग प्रमुख डॉ. वृषाली कणेरी यांच्या मार्गदर्शनाखाली या संकल्पनेला उत्तम प्रतिसाद मिळाला.

कॉलेज Club